दैनिक सकाळ 9 MARCH, 2005

# संरक्षणावरील खर्चाची कारणमीमांसा आवश्यक

### धनंजय जोशी यांचे मत

सकाळ वृत्तसेवा

औरंगाबाद, ता. ८ : अर्थसंकल्पात संरक्षणावरील खर्चात दरवर्षी वाढ केली जाते, पण वाढ कितपत आवश्यक आहे याची कोणीही कारणमीमांसा करीत नाही, अशी खंत पुणे येथील कॉस्ट अकाऊंटंट, 'आयसीडब्ल्यूएआय'च्या केंद्रीय परिषदेचे सदस्य धनंजय व्ही. जोशी यांनी सोमवारी (ता. सात) व्यक्त केली.

औरंगाबाद चॅप्टर ऑफ कॉस्ट अकाऊंटंटतर्फे हॉटेल प्रेसिडेंट पार्क येथे आयोजित अर्थसंकल्पविषयक अर्धदिवसीय चर्चासत्राचे उद्‌घाटन श्री. जोशी यांच्या हस्ते झाले, त्या वेळी ते बोलत होते. व्यासपीठावर अर्थतज्ज्ञ व्ही. एस. दाते, आयात-निर्यात सल्लागार अशोक नवाल, संजय भार्गवे, औरंगाबाद चॅप्टर ऑफ कॉस्ट अकाऊंटंटचे अध्यक्ष एस. बी. खडके, राजेंद्र गोरे यांची उपस्थिती होती. अर्थसंकल्पावरील निरीक्षणे मांडताना श्री. जोशी यांनी उत्पादक, अनुत्पादक खर्च, विकासदर, महसुली उत्पन्न व खर्च, वित्तीय व महसुली तूट यासह विविध मुद्यांना हात घातला. संरक्षण तरतुदीत यावर्षी सहा हजार कोटींनी वाढ करण्यात आली आहे. आवश्यकच आहे असे गृहीत धरून ही वाढ केली जाते. नियंत्रणाद्वारे संरक्षण खर्च कमी करून तो पैसा देशातील इतर महत्त्वाच्या समस्यांसाठी वापरता येईल का याचा कोणीही विचार करीत नाही. ही चिंतेची बाब आहे.



औरंगाबाद ■ चॅप्टर ऑफ कॉस्ट अकाउंटंटतर्फे आयोजित अर्थसंकल्पविषयक चर्चासत्राचे उद्‌घाटन धनंजय जोशी यांच्या हस्ते झाले. या वेळी व्ही. एस. दाते, अशोक नवाल, संजय भार्गवे, एस. बी. खडके, राजेंद्र गोरे आदी.

### सर्वांसोबत राहण्याची किंमत

अराजकतेमुळे जम्मू-काश्मीर, पूर्वोत्तर राज्ये यांच्यासाठी नेहमीच अर्थसंकल्पात विशेष तरतूद केली जाते. त्यात आता बिहार समाविष्ट झाला आहे. तेथील परिस्थिती सुधारण्यासाठी पाच हजार कोटी रुपये देण्यात येणार आहेत. इतर राज्यांना हकनाक हा बोजा सहन करावा लागणार आहे. सर्वांसोबत राहण्यासाठी मोजावी लागणारी ही किंमत आहे.

### निधी फलदायी होण्याची शंका

देशातील ६८ टक्के लोक कृषी क्षेत्रावर अवलंबून आहेत. त्यामुळे त्या क्षेत्रासाठी झालेली तरतूद चांगलीच आहे. साखर उद्योग, कापड उद्योग यांनाही चांगला लाभ मिळणार आहे. मात्र, साखर उद्योगासाठी मिळालेला निधी फलदायी होईल याबाबत तीव्र शंका वाटते.

### विजेसाठी तरतूद नाही

रस्ते, पाणी याप्रमाणे विजेचाही मूलभूत गोष्टींमध्ये समावेश होतो. सध्या वीज क्षेत्राची अवस्था बिकट आहे. या दृष्टिकोनातून अर्थसंकल्पात त्यासाठी तरतूद हवी होती, पण तरतूद करण्यात आलेली नाही. पाणी, लोकसंख्या तसेच सरकारी खर्चावरील नियंत्रणासाठी अर्थसंकल्पात काहीही दिसत नाही.

### चर्चासत्र रंगले

गुंतागुंतीचे विषय असूनही तज्ज्ञ वक्त्यांमुळे चर्चासत्र रंगले. संजय भार्गवे यांनी सेवाकरातील बदल, सेवाकराची वाढलेली व्याप्ती याबाबत मार्गदर्शन केले. अशोक नवाल यांनी आयातकरातील बदलांकडे लक्ष वेधत विविध तरतुदींविषयी चर्चा केली. व्ही. एल. दाते यांनी केंद्रीय अबकारी कर व आर. जी. झंवर यांनी आयकरातील बदलांबाबत माहिती दिली. सुरवातीला सुरेश पिंपळे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. ए. आर. जोशी यांनी चर्चासत्राचा आशय सांगितला. निखिल जोशी यांनी सूत्रसंचालन केले. यानंतर आयातकर, आयकर, अबकारी कर, प्रत्यक्ष कर यावर तज्ज्ञांची मनोगते व त्यानंतर प्रश्नोत्तरे झाली. एस. के. वाया यांनी आभार मानले.

दैनिक सकाळ 9/3/2005




**औरंगाबाद ■** 'चॅप्टर ऑफ कॉस्ट अकौंट्स'तर्फे गुणवंतांचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी गुणवंत विद्यार्थ्यांसह राजेंद्र एम. डुंगरवाल, डॉ. बी. वाय. क्षीरसागर, जे. एस. खैरनार, सुभाष खडके, ए. आर. जोशी, राजेश शुक्ला, आर. जी. मोदानी, एस. के. जैन आणि एस. के. वाया.

# 'आयसीडब्ल्यूए' परीक्षेतील गुणवंतांचा 'चॅप्टर'तर्फे सत्कार

औरंगाबाद, ता. १७ : 'इन्स्टिट्यूट ऑफ कॉस्ट अँड वर्क्स अकाऊंट्स ऑफ इंडिया'च्या (आयसीडब्ल्यूएआय) डिसेंबर २००४ मधील परीक्षेत यशस्वी विद्यार्थ्यांचा बुधवारी (ता. १६) औरंगाबाद चॅप्टर ऑफ कॉस्ट अकौंट्सतर्फे सत्कार करण्यात आला.

प्रमुख पाहुणे म्हणून 'डीपीएम अकाऊंट्स अँड फायनान्स'चे राजेंद्र एम. डुंगरवाल प्रमुख पाहुणे, तर अध्यक्षस्थानी सरस्वती भुवन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. वाय. क्षीरसागर होते. महाविद्यालयाचे उपप्राचार्य जे. बी. खैरनारही या वेळी उपस्थित होते. 'चॅप्टर'चे अध्यक्ष सुभाष खडके यांनी चॅप्टरच्या उपक्रमांची माहिती दिली. प्रशिक्षण समितीचे अध्यक्ष ए. आर. जोशी यांनी विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या सुविधा, मार्गदर्शन आदींविषयी माहिती दिली.

प्रमुख पाहुणे श्री. डुंगरवाल यांनी, व्यावसायिक परीक्षेतील यशासाठी ध्येय निश्चिती, निर्धार आणि लढाऊ वृत्ती हे गुण आवश्यक असल्याचे सांगितले. प्राचार्य डॉ. क्षीरसागर यांनी, शैक्षणिक देखाव्यांकडे दुर्लक्ष करून दर्जेदार शिक्षण मिळेल अशा ठिकाणीच लक्ष केंद्रित करण्याचे; तसेच पालकांनी पाल्यावर विश्वास ठेवून त्यांच्यातील सुप्त गुणांना वाव द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली. उत्तीर्ण विद्यार्थी आणि पालकांनीही मनोगत व्यक्त केले.

'चॅप्टर'चे सचिव राजेश शुक्ला यांनी प्रास्ताविक, सूत्रसंचालन केले. एस. के. वाया यांनी आभार मानले. एस. के. जैन, आर. पी. गोरे, एम. आर. पंडित, आर. जी. मोदाणी, गिरीश कुलकर्णी, आर. जी. झंवर, आर. बी. मुळी, प्रा. ए. बी. देशपांडे, श्री. सुरडकर, मिलिंद देशपांडे, अजय गोखले, विद्यार्थी, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. 'चॅप्टर'चे गुणवंत विद्यार्थी असे : इंटर कंप्लीट पास - अभिजित देशमुख, आशीष देवढे, सचिन इनामदार, सचिन मोरे, झफरीन मोती, अनिता नागोरी, स्वप्नील साहुजी आणि यतीन साहुजी. इंटर स्टेज एक - सरिता अमृते, नीलेश बंडाळे, इंद्रजित कल्याणकर, श्रद्धा कुलकर्णी, सिराज मेवानी, देवदत्त पुराणिक, सौरव उदास. इंटर स्टेज दोन- अमोल दगडिया, संदेश दुधानी, श्रद्धा तिवारी. फायनल स्टेज तीन - संतोष मिश्रा आणि पंकज साहुजी.आयसीडब्ल्यूएआय फाउंडेशन - निधी अग्रवाल, पूजा बरिदे, केदार बरिदे, विपुल भोंडे, किशोर दारगड, हर्शल देविदान, प्रियंका जैस्वाल, दीपा खंडेलवाल, अनुजा लोकरे, सुयश लोणी, पूनम माश्री, पंकज पाटील, प्राची पोहरे, प्रीती श्रोत्रे, किशोर राखे, उमेश रूपारेल आणि अभिषेक शर्मा.

# औरंगाबाद चॅप्टर ऑफ कॉस्ट अकाऊंटंटस्‌तर्फे आय.सी.डब्ल्यू.ए.च्या विद्यार्थ्यांचा सत्कार

**औरंगाबाद, दि.१७ (लोकमत ब्युरो)-** आय.सी.डब्ल्यू.ए.च्या डिसेंबर-२००४ मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या ३७ विद्यार्थ्यांचा सत्कार औरंगाबाद चॅप्टर ऑफ कॉस्ट अकाऊंटंटस्‌तर्फे राजेंद्र डुंगरवाल, बी.वाय. क्षीरसागर व जे.एस. खैरनार यांच्या हस्ते हॉटेल अतिथी येथे करण्यात आला.

या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून राजेश शुक्ला, जे.एस. खैरनार, एस.बी. खडके, बी.वाय. क्षीरसागर, राजेंद्र डुंगरवाल, एस.के. जैन, आर.पी. जैन यांची व्यासपीठावर उपस्थिती होती.

या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना राजेंद्र डुंगरवाल म्हणाले की, वेळेचे नियोजन करून अभ्यास करा. स्वत:च्या जीवनात सर्वांत कठीण काम सर्वात अगोदर करा. त्यामुळे आपण निश्चित केलेले ध्येय गाठू शकतो.

बी.वाय. क्षीरसागर बोलताना म्हणाले की, विद्यार्थ्यांना ज्ञान संकलन करावयाचे आहे. आपण मिळविलेले ज्ञान हे कसे विकसित करता हे महत्त्वाचे आहे. त्या गोष्टीत स्वत:ला किती सामावून घेतो यावर यश अवलंबून असते.

पालकांनी बाजारू शिक्षणाकडे आपल्या पाल्यांना पाठवू नये, असा मौलिक सल्ला त्यांनी यावेळी दिला. प्रास्ताविक एस.बी. खडके यांनी केले. या कार्यक्रमात पालक व विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन राजेश शुक्ला यांनी केले, तर आभार सुनील व्हया यांनी मानले.